# मेजर ध्यानचंद यांचे क्रीडा क्षेत्रातील योगदान

– डॉ. पी.के. लोहोटे

**परिचय** – ध्यानचंद सिंग (२९ ऑगस्ट १९०५ ते ३ डिसेंबर १९७९) हे भारतीय हॉकीचे नावाजलेले खेळाडू होते. त्यांना जागतिक खेळ विश्वातील सर्वोत्कृष्ट हॉकीचे खेळाडू म्हणून ओळखले जाते. त्यांना हॉकीचे जादूगार म्हणून संबोधले जायचे. त्यांनी भारताला १९२८, १९३२ व १९३६ मध्ये ऑलिम्पिक सुवर्ण पदक मिळवून दिले. त्यांच्या काळात भारतीय संघ सर्वात शक्तिशाली संघ म्हणून ओळखला जायचा. भारत सरकारने १९५६ साली त्यांचा पद्मभूषण या पुरस्काराने सन्मान केला. त्यांचा जन्मदिवस भारतीय खेळ दिवस म्हणुन साजरा केला जातो. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दिवशी देण्यात येणाऱ्या राजीव गांधी खेलरत्न पुरस्काराचे नाव मेजर ध्यानचंद खेलरत्न पुरस्कार असे केले आहे. हॉकीच्या इतिहासातील सर्वोत्तम खेळाडूंपैकी एक म्हणून आजही ओळखलं जातं. त्यांनी भारताच्या क्रीडा क्षेत्रात खूप मोठं योगदान दिल आहे. भारताची क्रीडा संस्कृती वाढावी ,त्याला प्रोत्साहन मिळावे, तसेच देशाच्या कानाकोपऱ्यात खेळाची जागरूकता निर्माण व्हावी या साठी आज त्यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने राष्ट्रीय क्रीडा दिवस साजरा केला जातो. राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त फिट इंडिया चळवळ सुरू झाली.राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त देशभरात सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या दिवशी सर्व देशामध्ये राष्ट्रीय क्रीडा दिन उत्सव साजरा करतात.

**जन्म** – ध्यानचंद यांचा जन्म उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. मेजर ध्यानचंद यांच्या वडिलांचे नाव रामेश्वर दत्तसिंह, पत्नीचे नाव जानकी देवी आईचे नाव शारदा सिंग, मुले अशोक कुमार.

**बालपणीचे जीवन** – ध्यानचंद यांचा जन्म २९ ऑगस्ट १९०५ रोजी उत्तर प्रदेशातील अलाहाबाद येथे झाला. त्यांचे मोठे भाऊ रूपसिंग हे सुद्धा हॉकीचे खेळाडू होते. ध्यानचंद यांचे वडील सामेश्वर दत्त सिंग हे ब्रिटीश सैन्यात होते. ते सुद्धा सैन्यात हॉकीच खेळायचे. अशाप्रकारे ध्यानचंद यांना हॉकीचे शिक्षण लहानपणापासूनच मिळाले. वडील आर्मीत असल्यामुळे त्यांची वारंवार बदली व्हायची, त्यामुळे त्यांना इयत्ता सहावी नंतर शिक्षण सोडावे लागले. नंतर हे कुटुंब उत्तरप्रदेशातील झाशी येथे स्थायिक झाले.

**हॉकी खेळाची सुरुवात –**

मेजर ध्यानचंद हे क्रीडा क्षेत्रातील हॉकी या खेळाचे गुरु मानले जायचे. हॉकीचा सराव त्यांनी दिवस रात्र एक करून इतका उत्तम केला होता की, प्रत्येक सामन्यांमध्ये ते असे काही जादू करून गोल करायचे की, त्यांच्या पराक्रमामुळे त्यांना जादूगार असं नाव पडलं. भारतामध्ये हॉकीचे नाव काढले तर तोंडामध्ये पहिला शब्द येतो तो म्हणजे मेजर ध्यानचंद. फक्त भारतातच त्यांची प्रसिद्धी नव्हती तर संपूर्ण विश्वात हॉकी घेण्यासाठी त्यांना सर्वोत्कृष्ट खेळाडू संबोधले जायचं. हॉकी या खेळाची आवड त्यांना लहानपणी लागली होती. वडिलांच्या होणाऱ्या सारख्या बदलीमुळे प्रत्येक वेळी या शहरातून दुसऱ्या शहरात त्यांना स्थलांतर करावे लागायचं. त्यामुळे त्यांचे शिक्षण अर्धवटच राहिले.

हॉकी खेळाचा सराव करून त्यांनी हॉकी या खेळामध्ये आपलं करिअर करण्याचं ठरवलं. लहानपणी ते गरीब असल्यामुळे १४ वर्षाचे ध्यानचंद झाडाच्या फांद्या कापून त्यांचे हॉकी स्टिक बनवून कपड्यांचा गोळा करून त्याने हॉकीचा सराव करायचे.

**क्रीडा शेत्रातील योगदान –**

मेजर ध्यानचंद यांनी ऑलिम्पिक मध्ये तीन वर्षे भारताचे प्रतिनिध करून तीन वर्ष सुवर्णपदक मिळविले होते. लहानपणीच वडिलांसोबत हॉकी सामना बघायला गेलेले ध्यानचंद यांनी पराभूत झालेल्या संघाला वडलांची परवानगी घेऊन तो सामना चार गोल करून जिंकून दिला. त्यांचे हॉकी खेळण्याची पद्धत पाहून व ते ज्या प्रकारे गोल करत त्यांची जिद्द, त्यांची खेळासाठी असलेली ती भूक पाहून ध्यानचंद यांना अधिकारी त्यांना सैन्यात घेण्यासाठी तयार झाले.

१९२२ मध्ये ध्यानचंद हे पंजाबचे सैनिक झाले आणि त्यांच्या सैनिक सैन्यातून हॉकी खेळण्यास सुरुवात केली. सुभेदार मेजर भोळे तिवारी हे ध्यानचंद यांचे सल्लागार होते. त्यांना हॉकीचे प्रशिक्षण देण्यामध्ये यांनी मदत केली. त्यांच्या यांनी भारताला १९२८, १९३२, १९३६ ऑलिंपिक मध्ये हॉकी खेळाचे सुवर्णपदक मिळवून दिले. १९३६ मध्ये भारतीय संघाने जर्मनी संघाला ८–१ हे गुण मिळवून विजय प्राप्त केला होता. तेव्हा ध्यानचंद यांनी अनवाणी पायाने खेळले होते. त्यांच्या हॉकी खेळातील कौशल्य आणि खेळाबद्दल असेलेली त्यांची मनोवृत्ती पाहून जर्मनीचे हिटलर यांनी स्वतः ध्यानचंद यांना त्यांच्या सैन्यांमध्ये वरिष्ठ पदासाठी संधी दिली होती.

ध्यानचंद यांचा मनामध्ये असलेले देशप्रेम त्यांना ती ऑफर घेण्यास रोखत होत. त्यामुळे अतिशय प्रेमाने ध्यानचंद यांनी हिटलर यांनी दिलेली ऑफरचा आदर करत ती ऑफर नकारली. त्या वेळी ध्यानचंद भारतासाठी प्रतिनिधित्व करत होते. त्या वेळी भारत हा विश्वातील हॉकी खेळासाठी सर्वोत्कृष्ट शक्तिशाली

संघ मानला जायचा.

ध्यानचंद यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द सर्वोत्तम आणि गौरवास्पद आहे. ध्यानचंद यांनी एकूण ४०० पेक्षा देखील अधिक गोल केले आहेत. जे या खेळामध्ये संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वात जास्त गोल आहेत. त्यांचा हा एक विश्व विक्रमच आहे. त्यांचा हा विक्रम कोणीही मोडला नाही. १९२६ मध्ये न्युझीलँड येथे एक हॉकी सामना रंगवण्यात आला होता.त्या सामन्यामध्ये ध्यानचंद यांचा देखील सहभाग होता. सामन्यामध्ये एकूण २० गोल करण्यात आले, त्यातील १० गोल स्वतः ध्यानचंद यांनी एकट्याने केले होते. न्युझीलँड मध्ये झालेल्या सामन्यांमध्ये भारत एकूण २१ सामने खेळेल त्यामध्ये १८ सामने भारताने जिंकली. या संपूर्ण स्पर्धेमध्ये भारताने १९० गोल नोंदविले गेले त्यातील १०० गोल तर एकट्या ध्यानचंद यांनी केले होते.

ध्यानचंद यांचे हॉकी खेळाचे रेकॉर्ड दिवसेंदिवस वाढत चालले होते. त्यामुळे भारत हा हॉकी या खेळासाठी संपूर्ण जगभरात प्रसिद्ध झाला. बॉल वरची त्यांची पकडम इतकी उत्तम होती की त्यांना द विझार्ड असं नाव पडलं. हे नाव त्यांना पंजाब मधील झेलम येथे हॉकीचा सामना रंगला तेव्हा पडलं.

या सामन्यात तर ध्यानचंद यांनी कमालच केली होती. त्यांच्या संघाने २ गोलाची गरज होती आणि यांनी आपल्या उत्तम कौशल्याने शेवटचे उरलेले तीन मिनिटांमध्ये ४ गोल करून दाखविले. इथून पुढे त्यांनी अनेक हॉकी सामन्यामध्ये भाग घेतला आणि त्यांचे रेकॉर्ड बघून त्यांचे आंतरराष्ट्रीय हॉकी सामन्यासाठी निवड झाली. लंडनमध्ये १९२७ साली लंडन फॉक्सस्टोन फेस्टिवल यामध्ये हॉकीचे सामने व्हायचे यातील १० सामन्यांमध्ये आपल्या भारत संघाने एकूण ७२ गोल केले त्यातील ३६ गोल तर ध्यानचंद यांनी केले होते. १९२८ मध्ये मध्ये भारताने ऑलिंपिक स्पर्धेत भारताला नेदरलँड बरोबर सामना करायचा होता. त्यावेळी मेजर ज्यांचे यांनी २ गोल करून दाखविले. भारत संघाचे एकूण ३ गोल होते त्यातील २ गोल तर ध्यानचंद यांनी केले होते. या गोष्टीमुळे भारताला सुवर्णपदक देखील मिळायचे. याचे संपूर्ण श्रेय मेजर धान्यचंद यांना जाते. त्यांना लॉस अंजलीस येथे १९३२ मध्ये ऑलम्पिक स्पर्धा रंगली होती, त्यामध्ये भारताचा सामना अमेरिकेशी होता त्या सामन्यांमध्ये २३-८ असा विक्रम करून करून भारताला सुवर्णपदक मिळवून दिलं. २३ पैकी ८ गोल ध्यानचंद यांचे होते. त्याच वर्षी बर्लिन ऑलिंपिक मध्ये आपल्या भारत संघाने जपान, हंगेरी, अमेरिका या देशांना झिरो गोलेन पराभूत केला. ध्यानचंद यांची हॉकी क्षेत्रातील होणारी प्रगती भारताला अभिमानास्पद ठरली . क्रीडा क्षेत्रामध्ये ध्यानचंद यांनी भारताचे नाव एक उच्च स्तरावर नेऊन ठेवले. त्यांचा या हॉकी

कारकीर्दीमुळे त्यांना मेजर ही पदवी देण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर त्यांना सलग ३ वर्ष भारताला ऑलम्पिक मध्ये सुवर्ण पदक मिळवून दिले. त्यांनी एकूण त्यांच्या कारकिर्दी मध्ये १००० गोल केले त्यातील ४०० गोल तर आंतरराष्ट्रीय संघाविरुद्ध होते. या गोष्टीमुळे भारत सरकारने त्यांना भारतातील सर्वोच्च पुरस्कार पद्मभूषण देऊन त्यांचा गौरव केला व नवी दिल्ली मधील ध्यानचंद राष्ट्रीय स्टेडिय नाव देण्यात आले.

**मृत्यू** – ध्यानचंद यांचा मृत्यू यकृत कर्करोगाने झाला. त्यांना यकृत कर्करोग हा विकार होता ३ डिसेंबर १९७९ या दिवशी मेजर ध्यान्चंद यांचे निधन झाले. १९४८ पर्यंत ते अंतरराष्ट्रीय सामने खेळत राहिले.

**निष्कर्ष** – ध्यानचंद यांनी भारताला १९२८, १९३२, १९३६ ऑलिंपिक मध्ये हॉकी खेळाचे सुवर्णपदक मिळवून दिले. ध्यानचंद यांची आंतरराष्ट्रीय कारकीर्द सर्वोत्तम आणि गौरवास्पद आहे. ध्यानचंद यांनी एकूण ४०० पेक्षा देखील अधिक गोल केले आहेत. जे या खेळामध्ये संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वात जास्त गोल आहेत. त्यांचा हा एक विश्व विक्रमच आहे. त्यांच्या कारकिर्दी मध्ये १००० गोल केले त्यातील ४०० गोल तर आंतरराष्ट्रीय संघाविरुद्ध होते. या गोष्टीमुळे भारत सरकारने त्यांना भारतातील सर्वोच्च पुरस्कार पद्मभूषण देऊन त्यांचा गौरव केला. मेजर ध्यानचंद च्या वाढदिवसाच्या स्मरणार्थ दरवर्षी २९ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिन साजरा केला जातो. त्यांच्या सन्मानार्थ दिल्लीतील नॅशनल स्टेडियमचे २००२ मध्ये ध्यानचंद नॅशनल स्टेडियम असे नामकरण करण्यात आले.

**संदर्भ** –


१. द गोल– श्री ध्यानचंद यांचे चरित्र
२. The HinduTimes of India.indiatimes.com
३. Gazette of Ministry of Youth 2012
५. गृह मंत्रालय सरकारचे राजपत्र. भारताचे (२००२)
६. भारतीय पत्रकार महासंघ २०१२ चे अधिकृत रेकॉर्ड.
७. Times of India.indiatimes.com
८. हाऊस ऑफ कॉमन्सचे अधिकृत रेकॉर्ड, ब्रिटिश संसद दिनांक २५ जुलै.
९. Indian Army List August 1947 (Special ed.). Government of India Press. 1947. pp. 764 A.
१०. National Sports ¦ay 2017: Remembering 'The Wizard' Majordhyan Chand on his birthday. Daily Hunt, India (29 August 2017). Retrieved on Nov 2022.


ØŠ